# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते ठाणे भुयारी रेल्वेमार्ग उभारण्याच्या प्रस्तावाबाबत

**(१) १३०४ (१८-०३-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते ठाणे दरम्यान प्रवाशांची वर्दळ लक्षात घेता उक्त मार्गावर भुयारी रेल्वेमार्ग उभारण्याचा निर्णय मुंबई रेल्वे विकास महामंडळाने घेतला असून सदर रेल्वेमार्गाचा मुंबई शहरी परिवहन प्रकल्प-४ अंतर्गत समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते ठाणे भुयारी रेल्वेमार्गास मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मंजुरीकरीता पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या व्यवहार्यतेची शासनाकडून पडताळणी करण्यात आली आहे काय तसेच उक्त प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे व त्यास मंजुरी देण्याबाबत होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

रेल्वे बोर्डामार्फत ठाणे ते छत्रपती शिवाजी टर्मिनस दरम्यान सदर प्रकल्पाची तांत्रिक व्यवहार्यता अहवाल तपासण्यात येत असून. सदर भुयारी उपनगरीय रेल्वे मार्गाचा तांत्रिक व्यवहार्यता अहवाल MRVC कडून तयार करण्यात आला आहे.

(२) होय हे खरे आहे.

सदर प्रकल्पाचा तांत्रिक व्यवहार्यता अहवाल मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन मार्फत दिनांक २३/०७/२०१९ रोजी मान्यतेस्तव शासनास सादर करण्यात आला आहे.

(३) व (४) सदर अहवालावर एमएमआरडीए, एमएमआरसीएल व ठाणे महानगरपालिका यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत. तथापि, एमएमआरडीए व ठाणे महानगरपालिका यांचेकडून अहवाल अद्याप प्राप्त झालेले नाहीत. अभिप्राय प्राप्त करुन घेण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## राज्यात शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या स्वयंपुनर्विकास योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याबाबत

**(२) २०४८ (१८-०३-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनातर्फे स्वयंपुनर्विकासासाठी आखलेल्या प्रोत्साहनपर योजनेला अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७ पासून स्वयंपुनर्विकासासाठी म्हाडाकडील स्वतंत्र कक्षाकडून केवळ १४ गृहनिर्माण सहकारी संस्थांनी ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) घेतल्यामुळे सदर योजनेची व्याप्ती वाढविण्यासाठी गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वयंपुनर्विकास योजनेस चालना देण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०२-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

म्हाडा प्राधिकरणाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, निवासी कार्यकारी अभियंता/मुंबई मंडळ या विभागामध्ये म्हाडा अभिन्यासाकरीता स्वयंपुनर्विकास कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सन २०१७ पासून स्वयंपुनर्विकासासाठी म्हाडाकडील स्वतंत्र कक्षाकडुन एकूण २६ गृहनिर्माण सहकारी संस्थांना देकारपत्र जारी करण्यात आलेले आहेत.
(३) राज्यातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासास चालना देण्याकरीता शासनाने दिनांक १३/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सवलती दिल्या आहेत. सदरहू शासन निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित प्रशासकीय विभागांना त्यांच्या स्तरावर अंमलबजावणी करण्याबाबत विनंती केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर येथील डॉक्टर व परिचारीकांना PPE किट्स उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३) ३११८ (२९-०५-२०२०) श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील CPR या शासकीय रुग्णालयात फाटक्या PPE किट्स पुरविण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फाटलेल्या PPE किट्समुळे डॉक्टर्स, परिचारीका या कोविड योध्दयांनाच कोरोना संसर्गाची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोल्हापूर येथील CPR या शासकीय रुग्णालयात डॉक्टर्स, परिचारीका या कोविड योध्दयांना चांगल्या प्रतीचे PPE किट्स पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०७-१२-२०२१) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयामधील डॉक्टर्स, परिचारीका यांना केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाने PPE किट प्रमाणित करण्यासाठी अधिकृत केलेल्या सिट्रा प्रयोगशाळेची मान्यता असलेल्या उत्तम दर्जाच्या PPE किट्स पुरविण्यात येत आहेत. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात विशेषत: विदर्भातील जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक रुग्णालयाची दूरवस्था झाल्याबाबत

**(४) ३३८२ (३१-०५-२०२०) श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: विदर्भात चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा ही जिल्हे आदिवासी व नक्षलप्रभावी असून येथील जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक रुग्णालयाची दूरवस्था झाल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात कोरोनासारख्या आजाराचा प्रादुर्भाव वाढल्याने रुग्णांची गैरसोय होत असून गडचिरोली येथे वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१०-१२-२०२१) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

रुग्णांची कुठलीही गैरसोय होत नाही. तथापि, गडचिरोली येथे वैद्यकिय महाविद्यालय सुरु करण्याची मागणी केली असल्याबाबत निवेदन विभागात आढळून आले नाही.

(३) गडचिरोली येथे वैद्यकिय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी प्राथमिक तपासणी समितीचा अहवाल संचालक, संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई दिनांक १०/०२/२०२० रोजी सादर केलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई येथील बीकेसीमध्ये कोरोना रुग्णालय उभारताना कंत्राटदाराला ४० टक्के जादा दराने काम बहाल केल्याबाबत

**(५) ४१४३ (१६-०७-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील बीकेसीमध्ये एमएमआरडीएने पहिल्या टप्प्याचे तात्पुरते कोरोना रुग्णालय उभारताना अत्यंत शीघ्रतेने व हलगर्जीपणे कंत्राटदाराला ४० टक्के जादा दराने काम बहाल केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएमआरडीएने रुग्णांसाठी खाटा, गाद्या, चादरी, उशांची कव्हर आदींसाठी १० टक्के ते ४७ टक्के जास्त दराने रक्कम दिल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालय उभारण्याकरीता एमएमआरडीएने निविदा मागविल्या असत्या तर हे रुग्णालय जास्तीत जास्त अकरा ते बारा कोटी रुपयांत उभारून झाले असते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, केलेल्या कार्यवाहीचे स्वरुपाचे काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१) :** (१), (२) व (३) वांद्रे-कुर्ला संकुलाशेजारील धारावी या दाटीवाटीच्या परिसरात मोठ्या प्रमाणात कोरोना रूग्ण सापडत असल्याने रुग्णांना पर्याप्त वैद्यकीय सुविधा त्वरीत उपलब्ध करून देणे क्रमप्राप्त होते. अशा उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये ई-निविदा, जेम पोर्टल इ. पध्दतीने करावयाच्या खरेदीस लागणारा जास्तीचा कालावधी आणि आपत्कालीन परिस्थिती व निकड विचारात घेता ई-निविदा ऐवजी केंद्र व राज्य शासन यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आपत्कालीन खरेदी संदर्भ विचारात घेऊन खरेदी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक १ डिसेंबर, २०१६ व केंद्र शासनाच्या अर्थ विभागाच्या मॅन्युअल फॉर प्रोक्युअरमेंट ऑफ गुड्स, २०१७ मधील संबंधित तरतुदींन्वये आवश्यक वैद्यकिय उपकरणे व सेवा यांची खरेदी/भाडेतत्वावर सेवा उपलब्ध करुन घेण्यात आली आहे. सदर खरेदी व भाडे तत्वावरील सेवा केविड-१९ मधील निमंत्रित तज्ञ सदस्य यांच्या मार्गदर्शन व शिफारशीनुसार खरेदी करण्यात आलेली आहे.

कोविड-१९ विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून १,००० खाटांचे तात्पुरत्या स्वरुपातील रुग्णालय तयार करणे तसेच रुग्णालयासाठी वैद्यकीय व इतर आवश्यक साधनसामुग्री खरेदी करणे व सोयीसुविधा पुरविणे याकरीता वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञांच्या समावेशासह अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती.

प्राधिकरणातर्फे वांद्रे-कुर्ला संकुलात उभारण्यात आलेल्या कोविड-१९ समर्पित केंद्रासाठी उपकरणे व साधनसामुग्री, रुग्णालयाचे स्थापत्य आणि विद्युत उपकरणे व आयटी उपकरणे यांसाठी एकूण सुमारे रुपये १९.९५ कोटी इतका खर्च आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरांचा ताबा लाभार्थ्यांना मिळाल्याबाबत

**(६) ४२९७ (१४-०९-२०२०) श्री.रामदास कदम :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास योजनेंतर्गत राज्यातील शहरी भागात सन २०२२ सालापर्यंत १९ लाख ४० हजार घरबांधणीचे उद्दिष्ट ठेवुन ११ लाख ७४ हजार घरांचे प्रस्ताव मंजूर झाल्याचा दावा करण्यात आला असून आज पर्यंत फक्त ३६ हजार घरांचा ताबा लाभार्थ्यांना मिळाल्याची धक्कादायक बाब माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर घरे पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०८-१२-२०२१) :** (१) केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योंजनेंतर्गत राज्याकरीता १९ लाख ४० हजार घरकुल निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सदर योजनेंतर्गत केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (CSMC) माहे ऑक्टोबर, २०२० अखेरपर्यंत १००८ प्रकल्पातील ११,७४,५९१ घरकुलांना मंजूरी दिलेली आहे. तसेच घटक क्र.२ CLSS या घटकाखाली २,४९,०६६ लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला आहे. त्यापैकी माहे ऑक्टोबर, २०२० अखेरपर्यंत २,७१,२३७ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. तसेच माहे सप्टेंबर, २०२१ पर्यंत ४,५९,३६८ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून, ७,०२,९६१ घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(२) प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने केलेल्या विविध उपाय योजनांनुसार दिनांक ०३/०८/२०१६ च्या आदेशानुसार मोजणी शुल्कात ५०% सवलत देण्यात आली असून, दिनांक १९/०९/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय जमीन रुपये १/- प्रती चौ.मी. या नाममात्र दराने वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच दिनांक ३१/०३/२०१८ च्या आदेशान्वये आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व अल्प उत्पन्न घटक गटातील लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या सदनिकेसाठी केवळ

पहिल्या दस्ताला रुपये १०००/- इतका मुद्रांक शुल्काचा सवलतीचा दर निश्चित करण्यात आला आहे. राज्यात प्रधानमंत्री आवास योजनेस गती देण्याच्या अनुषंगाने दिनांक ११/०१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक-खाजगी धोरणाची (PPP) राज्यात अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच प्रकल्प वेळेवर पूर्ण होण्याकरीता अभियान संचालनालय म्हणून म्हाडा प्राधिकरणाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील अति विशेषोपचार रूग्णालयात सीटी स्कॅन मशीन तसेच मेडीकल रूग्णालयातील सीटी स्कॅन व एम.आर.आय. मशीन बंद असल्याबाबत

**(७) ४७०१ (१३-०८-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक : तारांकित प्रश्न क्रमांक ४७५४९ ला दिनांक १ जुलै, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील अति विशेषोपचार रूग्णालयातील सीटी स्कॅन मशीन मागील अनेक दिवसांपासून तसेच मेडीकल रूग्णालयातील सीटी स्कॅन व एम.आर.आय. मशीन अनेक महिन्यांपासून बंद असल्याची बाब माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेडीकल रूग्णालयातील सीटी स्कॅन व एम.आर.आय. मशीन तसेच अति विशेषोपचार रूग्णालयातील सीटी स्कॅन मशीन ही महत्वपूर्ण उपकरणे बंद असल्याने कोरोना व्हायरसच्या संसर्ग काळात शासनाने कुठलीही व्यवस्था केली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अति विशेषोपचार रूग्णालय व ट्रामा सेंटरमध्ये अद्ययावत प्रगत एम. आर. आय. उपकरण खरेदीचा प्रस्ताव शासनाकडे दोन वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने अति विशेषोपचार रूग्णालयात सीटी स्कॅन मशीन व मेडीकल रूग्णालयातील सीटी स्कॅन व एम.आर.आय. मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०८-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विस्थापित व निकषानुसार भरती न केलेल्या शिक्षकांच्या बदली प्रक्रियेत संधी देताना जिल्हा परिषद प्रशासनाने जागा कमी दाखविल्याबाबत

**(८) ४९१६ (१४-११-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हा परिषदेत विस्थापित व निकषानुसार भरती न केलेल्या शिक्षकांच्या बदली प्रक्रियेत संधी देताना दिनांक ४ सप्टेंबर, २०१९ रोजी ग्रामविकास विभागाकडून पदस्थापनेचे निर्देश प्राप्त झाले असताना जिल्हा परिषद प्रशासनाने १९० पैकी १०० जागा कमी दाखविल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून जिल्हा परिषदेंतर्गत या सर्व जागा निवडीकरीता उपलब्ध करुन द्याव्यात अशी मागणी शिक्षक संघटनांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पदस्थापनेची प्रक्रिया सुरू असताना दिनांक ६ ऑक्टोबर, २०२० मध्ये शिक्षणाधिकारी यांनी एक पत्र काढून खाजगी शाळेतील अतिरिक्त शिक्षकांची यादी करण्याची प्रक्रिया सुरू केली असून एकीकडे विस्थापित व निकषानुसार भरती न केलेल्या शिक्षकांना दुर्गम भागातील

शाळा दर्शवून खाजगी शिक्षकांना शहरालगतच्या शाळा राखुन ठेवण्याचा शालेय शिक्षण विभागाचा हेतू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सध्याच्या प्रक्रियेत बदल करुन समुपदेशासाठी पात्र शिक्षकांना जिल्हा परिषदेंतर्गत १९० जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०७-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे. मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.३२७८/२०१० प्रकरणी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व रिक्त जागा दर्शविण्यात आल्या नव्हत्या.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मूल (जि.चंद्रपूर) येथील माजी मालगुजारी तलावाच्या सौंदर्यीकरणासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(९) ५२४९ (१८-११-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूल (जि.चंद्रपूर) येथील माजी मालगुजारी तलावाच्या सौंदर्यीकरणासाठी जलसंपदा विभागाने सन २०१८-२०१९ मध्ये रुपये ४९८.९७ लाखाचे अंदाजपत्रक सादर केले असून महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाकडून रुपये ३ कोटी प्राप्त होवूनही तलावाची उर्वरीत कामे निधी अभावी प्रलंबित असल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर सौंदर्यीकरणाच्या उर्वरीत कामाकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०१-१२-२०२१) :** (१) व (२) "चांदा ते बांदा" योजनेंतर्गत मूल (जि.चंद्रपूर) येथील माजी मालगुजारी तलावातील गाळ काढणे व इतर कामांसाठी रुपये २३१.८६ लक्ष निधी जलसंपदा विभागास उपलब्ध करुन देण्यात आला आहे. जलसंपदा विभागाकडून सदर निधीमधून तलावातील गाळ काढणे व धरण पातळीवरील अश्मपटलाची कामे करण्यात आली असून उपलब्ध निधीपैकी रुपये १५८.४७ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

मूल येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत कार्यान्वित कामे अंतिम टप्प्यात आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ऊस तोडणी कामगार व वाहतूकदारांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्याबाबत

**(१०) ५४९१ (१३-११-२०२०) श्री.सुरेश धस, श्री.विनायकराव मेटे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात लवाद कराराची मुदत तीन वर्षे करावी, मजुरीमध्ये १५० टक्के वाढ करावी, मुकादमचे कमिशन ३५% करावे, ऊसतोड कामगारांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना, मजुरांचा विमा हप्ता शासन व कारखान्यांनी भरावा, ऊसतोड कामगारांच्या पाल्यांसाठी निवासी शाळा सुरु करण्यात याव्यात, राज्यात माथाडी कामगार कायद्याप्रमाणे ऊसतोड कामगारांसाठी कायदा व्हावा अशा विविध मागण्यांसाठी राज्यात ऊसतोड संघटना, वाहतूकदार संघटना, श्रमिक संघटना व भारतीय जनता पक्ष आक्रमक झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या राज्यात ऊस तोडणी मजुर, मुकादम व वाहतूकदारांच्या संघटनांचा संप सुरू असून विविध मागण्यांसह कामगार कायदा लागू करण्याची त्यांची प्रमुख मागणी असून ऊसतोडणी मजुरांना कामगार कायदा लागू करण्यासाठी व कायद्याचे संरक्षण देण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली आहे तसेच ऊस तोड कामगार व वाहतूकदारांचा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित असून त्यांची पूर्तता न केल्यास राज्यव्यापी आंदोलनाची भूमिका भारतीय जनता पक्ष, ऊसतोड कामगार संघटना, वाहतूकदार संघटना, श्रमिक संघटना यांच्याकडून घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऊसतोड कामगारांच्या या संपादरम्यान ऊसतोड कामगार संघटनांनी लवादाऐवजी ऊसतोड कामगारांचे प्रश्न मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मुकादम, कामगार, साखर संचालक व कारखाना प्रतिनिधी घेऊन ११ लोकांची समिती नेमावी, त्यांनी निर्णय घ्यावेत अशी प्रमुख मागणी केली असून वर्षानुवर्षे या लवादाच्या नावाखाली कामगार, मुकादम, वाहतूकदारांची फसवणूक होत असल्याने लवादास शासकीय मान्यता आहे काय,

(४) असल्यास, स्व.गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ स्थापन करण्यात आले असून या महामंडळाची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ऊसतोड कामगार व वाहतूकदारांच्या विविध मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०८-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

विविध संघटनांच्या निवेदनामध्ये बेमुदत संप पुकारण्यात येईल असे नमुद केल आहे. तथापि, राज्यात दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० पासून गाळप हंगाम चालू झाला असून दिनांक २४/११/२०२० अखेर ७९ सहकारी व ७०१ खाजगी असे एकूण १४९ कारखान्यांनी गाळप सुरू केलेले आहे.

राज्यात ऊसतोडणी मजुर मुकादम व वाहतूकदार संघटनांचा संप झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) ऊसतोड कामगारांच्या प्रश्नाबाबत महाराष्ट्र राज्य साखर संघ आणि ऊसतोडणी व वाहतूक संघटना साखर कारखानदार याच्यात बैठक हौउन निर्णय घेतला जातो. सदर बैठक दिनांक २७/१०/२०२० रोजी संपन्न होऊन ऊसतोडणी व वाहतूकदार कामगारांच्या प्रश्नाबाबत निर्णय झाला आहे.

(४) शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० अन्वये गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ तसेच ऊसतोड कामगारांसाठी विविध कल्याणकारी सामाजिक सुरक्षा योजना हे विषय उद्योग ऊर्जा व कामगार विभागाकडून सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आले. विभागाच्या दिनांक २३/०६/२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळास नविन लेखाशिर्षास मान्यता देण्यात आलेली आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्राम विद्युत व्यवस्थापकांना मानधन अदा करण्याबाबत

**(११) ५६०७ (१३-११-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागातील वीजपुरवठा नियमित सुरु रहावा, तांत्रिक बिघाड आल्यास तो तत्परतेने दुरुस्त व्हावा, यासाठी शासनाने सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान ज्या गावांची लोकसंख्या तीन हजार असेल, अशा गावांसाठी ग्राम विद्युत व्यवस्थापकाची नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राम विद्युत व्यवस्थापक कोरोना महामारीच्या काळातही तत्परतेने सेवा देत असताना मागील ६ महिन्यांपासून त्यांना शासनाने मानधनाची रक्कम अदा केली नसल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या ६ महिन्यांपासून थकीत असलेले मानधन मिळावे अशी मागणी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, नागपूर, मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, नागपूर, प्रधान सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय तसेच मा.पालकमंत्री, नागपूर जिल्हा यांचेकडे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्राम विद्युत व्यवस्थापकांना मानधनाची थकीत रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०६-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

प्रत्येक महिन्यात ग्राम विद्युत व्यवस्थापकांनी केलेल्या कामाचे विवरणपत्र भरुन ग्रामपंचायतींना महावितरणच्या संबंधित शाखा कार्यालयास विहित मुदतीत सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, बऱ्याच ग्राम पंचायतींकडून "ग्राम विद्युत व्यवस्थापक" यांचे कामाचे विवरणपत्र व हजेरी पत्रक विहित मुदतीत प्राप्त होण्यास विलंब होतो. अशा कारणांमुळे ग्राम विद्युत व्यवस्थापकांना मासिक मानधन वेळेवर अदा करता येत नाही.
(३), (४) व (५) मुख्य अभियंता, नागपूर यांनी त्यांच्या दिनांक १९/०७/२०२१ च्या पत्रान्वये महावितरण कपंनीस कळविल्यानुसार नागपूर ग्रामीण मंडळाअंतर्गत सावनेर, मौदा, काटोल व उमरेड या तालुक्यातील एकूण १२३ ग्राम पंचायतींमध्ये ग्राम विद्युत व्यवस्थापक कार्यरत होते. त्यापैकी ३ ग्राम विद्युत व्यवस्थापक काम सोडून गेल्यामुळे नागपूर ग्रामीण मंडळाअंतर्गत १२० ग्राम विद्युत व्यवस्थापक कार्यरत आहेत. ग्राम विद्युत व्यवस्थापकांचे हजेरी पत्रक वेळेवर पाठविण्याबाबत पंचायत समिती व ग्रामपंचायत कार्यालयाशी महावितरण कंपनीच्या विभागीय कार्यालयामार्फत पाठपुरावा केल्यानंतरही योग्य प्रतिसाद मिळत नसल्यामुळे विहित मुदतीत ग्राम विद्युत व्यवस्थापकांचे मानधन अदा करण्यासाठी विलंब होत असल्याचे निदर्शनास येते. महावितरण कंपनीच्या विभागीय कार्यालयांकडून विलंब टाळण्यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याबाबत सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

---

## मराठवाडा शिक्षण संस्था, नांदेड येथे गैरमार्गाने प्रशासकाची नियुक्ती केल्याबाबत

**(१२) ६०२३ (१३-१२-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन किंवा शिक्षणाधिकारी यांना शैक्षणिक संस्थेवर नियमबाह्य प्रशासक नियुक्तीचे अधिकार आहेत काय, तसेच सदर बाब धर्मदाय आयुक्तांच्या कार्यकक्षेत आहे काय,

(२) असल्यास, शासन आदेश नसताना मराठवाडा शिक्षण संस्था संचालित कस्तुरबा गांधी प्राथमिक शाळा वसंतनगर, नांदेड शाळेवर प्रशासक म्हणून रुजू झालेल्या शिक्षणाधिकाऱ्यावर कोणती कार्यवाही केली,

(३) असल्यास, मराठवाडा शिक्षण संस्थाद्वारा संचलित राजश्री शाहू विद्यालय, वसंतनगर, नांदेड शाळेस आय.एस.ओ. मानांकन प्राप्त असताना प्रशासक नियुक्तीची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-१२-२०२१) :** (१) महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) अधिनियम, १९७६ मधील कलम ३(१) नुसार प्रशासक नियुक्तीचे अधिकार शिक्षण संचालकांना आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) संस्थांतर्गत वाद, शाळा समिती कामकाजातील अनियमितता, आर्थिक अनियमितता, वेतनेतर अनुदानाचे निर्धारण-विनियोगातील अनियमितता, खालावलेला शैक्षणिक दर्जा, कर्मचारी सेवाशर्ती भंग विषयक प्रकरणे, व्यवस्थापनाच्या नियंत्रणाच्या अभावामुळे शाळेच्या शैक्षणिक व प्रशासकीय बाबींवर झालेला परिणाम, संस्था-शाळा बाबत तक्रारी, शाळेच्या भौतिक व शैक्षणिक सुविधा विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात उपलब्ध नसणे, आरटीई, २००९ नुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडून आरटीई मान्यता घेतलेली नसणे, शालेय अभिलेख अद्ययावत नसणे, विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेमध्ये अनियमितता असणे व शिक्षक-पालक संघाची स्थापना केलेली नसणे इ. कारणे आहेत.

---

## हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाकडे औषध वितरकांची रक्कम थकीत असल्याबाबत

**(१३) ६२७८ (२०-११-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय रुग्णालयांना आवश्यक असणारी औषधे तसेच इतर वैद्यकीय सामग्रीची उपलब्धता हाफकिनच्या माध्यमातून करण्यात येत असून मागील दोन वर्षांमध्ये हाफकिनने राज्यातील विविध औषधे वितरकांना रुपये २२० कोटीची देयके अदा केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औषध वितरकांना औषधांचा पुरवठा केल्यानंतर हाफकिन बायो फार्मासिटिकल्समध्ये वारंवार जावे लागत असून सदरहू प्रलंबित देयके मंजूर न झाल्यास हाफकीनच्या कार्यालयाबाहेर आंदोलन करण्यात येईल असा इशारा ऑल स्टुडन्ट लायसन्स होल्डर्स असोसिएशन्सने हाफकिनला दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील रुग्णालयांना आवश्यक औषधे, उपकरणे उपलब्ध करुन देणाऱ्या औषध वितरकांचे ९७ कोटी थकित ठेवण्याची कारणे काय आहेत, तसेच संपूर्ण राज्यात कोरोनाचा होत असलेला प्रसार व कोरोनाची दुसरी लाट माहे डिसेंबर, २०२० ते जानेवारी, २०२१ या कालावधीत येण्याची सूचना दिलेली असताना, सदरहू रुग्णांसाठी आवश्यक ती औषधे व वैद्यकीय उपकरणे सुरळीतपणे उपलब्ध होण्याकरीता तसेच सदरहू औषध वितरकांची रुपये ९७ कोटीची रक्कम विनाविलंब अदा होण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०७-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) मे.हाफकिन महामंडळाकडे पुरवठादारांची देयके पुरेसे अनुदान उपलब्ध नसणे, पुरवठादारांनी आवश्यक कागदपत्रे देयकाबरोबर सादर न करणे, कोषागार कार्यालयाने घेतलेले आक्षेप इत्यादी कारणांमुळे प्रलंबित आहेत. पुरवठादारांची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन घेऊन मार्च, २०२२ पर्यंत सदर देयके अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर शहराला उजणी जलाशयातून पाणीपुरवठा करण्याबाबत

**(१४) ६४४३ (१७-०३-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रमेश कराड : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक २८८३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शहरास अधिक शाश्वत स्त्रोतावरुन पाणीपुरवठा करण्याच्या हेतूने उजनी धरण व माजलगाव धरण या दोन स्त्रोतावरुन पाणीपुरवठा करण्याबाबतची व्यवहार्यता तपासण्याच्या सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर शहरास पाणीपुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने उजनी जलाशय उध्दव गृहीत धरुन योजनेची प्राथमिक आखणी करुन ढोबळ अंदाजपत्रक तांत्रिक व सविस्तर तपासणीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडे सादर केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सदर अंदाजपत्रकावर उपस्थित मुद्यांची पुर्तता करण्याची तसेच योजनेची व्यवहार्यता तपासणी सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-१२-२०२१) :** (१), (२), (३), (४) व (५) लातूर शहरास सद्य:स्थितीत मांजरा धरण या स्त्रोतावरुन पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

लातूर शहरास अधिक शाश्वत स्त्रोतावरुन पाणीपुरवठा करण्याच्या हेतूने उजनी धरण व माजलगाव धरण या दोन स्त्रोतावरुन पाणीपुरवठा करण्याबाबतची व्यवहार्यता तपासण्याच्या सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देण्यात आल्या होत्या.

त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने लातूर शहरास पाणीपुरवठा करण्यासाठी उजनी जलाशय उद्भव गृहीत धरुन योजनेची प्राथमिक आखणी केली होती.

तथापि, लातूर शहराचा समावेश गोदावरी खोऱ्यात येत असल्यामुळे प्रथम कृष्णा पाणी तंटा लवादाचे निर्णयातील अटी व शर्ती विचारात घेता उजनी प्रकल्पातून लातूर शहरासाठी पाणी वापर अनुज्ञेय ठरत नाही.

---

## चुळणे (ता.वसई, जि.पालघर) गावातील विकास कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(१५) ६५३० (१५-०३-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चुळणे (ता.वसई, जि.पालघर) गावातील नाल्याचे बांधकाम, पाणी समस्या, रस्ते दुरुस्ती व नाल्यावरील पुल इत्यादी विकास कामे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून विकास कामे सुरु करण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी पालिका आयुक्तांकडे निवेदन देऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील विकास कामे न होण्याची कारणे काय आहेत व विकास कामांसाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निधी उपलब्ध करुन चुळणे गावातील विकास कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-१२-२०२१) :** (१) होय. अशाप्रकारचे निवेदन वसई-विरार शहर महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

(२) व (३) वसई विरार शहर महानगरपालिकेने चुळणे गावात विकास कामांसाठी खालीलप्रमाणे निधी खर्च केल्याची वस्तुस्थिती कळविली आहे :-

| वर्ष/ महिना | खर्च |
|---|---|
| २०१८-२०१९ | १,६३,११,३१३/- |
| २०१९-२०२० | ३९,९७,२९२/- |
| २०२०-२०२१ | १,२९,००,४९३/- |
| सप्टेंबर, २०२१ | १,६३,२०,६१९/- |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्हा परिषद येथील समाजकल्याण अधिकारी हे पद भरण्याबाबत

**(१६) ६८२२ (१५-०३-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागात विकासात्मक कामे जिल्हा परिषदेच्या विविध विभागामार्फत केली जातात त्याद्वारे शासकीय योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहचविला जात असून गत ३ ते ४ वर्षांपासून ठाणे जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाचा कार्यभार प्रभारी अधिकारी पहात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकल्याण अधिकारी, ठाणे जिल्हा परिषद हे पद भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी मा.समाजकल्याण मंत्र्यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१३-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे. तथापि, सद्य:स्थितीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे या पदावर दिनांक ०५/०२/२०२१ पासून नियमित अधिकारी कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही. सदर निवेदन या विभागात प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) सद्य:स्थितीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे या पदावर दिनांक ५/०२/२०२१ पासून नियमित अधिकारी कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथे बोट क्लबची निर्मिती करण्याबाबत

**(१७) ७९१२ (१५-०३-२०२१) श्री.दुष्यंत चतुर्वेदी :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटक आंध्रप्रदेशात जाण्यासाठी नागपूर शहराचा मार्ग अवलंबित असून नागपूर शहराला टायगर कॅपिटल ऑफ इंडियाचा दर्जा असल्याने त्याचे ऐतिहासिक व पौराणिकदृष्टया महत्व वाढवून पर्यटनाला चालना देण्यासाठी नागपूर येथे बोट क्लबची निर्मिती करण्याची मागणी मा.पर्यटन मंत्री यांचेकडे लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०६-१२-२०२१) :** (१) होय.

(२) सदर मागणीच्या अनुषंगाने नागपूर शहरात अंबाझरी तलाव येथे तसेच अन्य ठिकाणी बोट क्लब सुरु करण्याबाबतचा व्यवहार्यता अहवाल महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद शहराचा जुना आणि नविन विकास आराखडा एकत्रितरित्या तयार करण्याबाबत

**(१८) ७९९६ (१७-०३-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहराचा जुना आणि नविन विकास आराखडा एकत्रितरित्या तयार करण्याचे निर्देश माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाने देवून १० महिन्यांचा कालावधी उलटूनही सदर विकास आराखडा तयार करण्याकरीता अद्याप अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,

हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने निर्देश देऊनही सदर विकास आराखडा तयार करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१) :** (१) व (२) प्रशासन, औरंगाबाद महानगरपालिका यांनी दिनांक ३१/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये औरंगाबाद महानगरपालिकेची विकास योजना सुधारित करण्याकरीता विशेष घटकाची नियुक्ती करण्याची शासनास विनंती केली होती. त्यानुषंगाने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून दिनांक २४/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अहवाल शासनास सादर करण्यात आला. त्यानुसार, औरंगाबाद शहर सुधारित मंजूर विकास योजना (मुळ हद्द) व औरंगाबाद शहर (वाढीव हद्द) मंजूर विकास योजना एकत्रितरित्या सुधारित करणेकरीता उप संचालक, नगर रचना, विकास योजना विशेष घटक, नांदेड वाघाळा महानगरपालिका हे कार्यालय उप संचालक, नगर रचना, विकास योजना विशेष घटक, औरंगाबाद महानगरपालिका येथे दिनांक ०२/०८/२०२१ रोजीच्या आदेशान्वये पदांसहित स्थलांतरीत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील “एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई” येथील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) ८५१९ (१७-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे** : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील साहित्यिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरा असणाऱ्या “एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई” ची अंतर्गत व्यवस्था मनुष्यबळाअभावी बंद असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी असलेल्या प्राचीन व अनमोल ठेव्याची योग्य देखभाल करण्याकरीता तज्ञांची नेमणूक करण्यात आली नसून ग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल या पदावर कंत्राटी पध्दतीने तज्ज्ञांची नेमणूका करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, "एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई" मध्ये २०० वर्षाचा इतिहास, विविध भाषेतील लाखो पुस्तके, ग्रंथसंवर्धन, प्रयोगशाळा, हजारो प्राचीन नाणी आणि हस्तलिखिते, नियतकालिके व वृत्तपत्रांचे जुने अंक असा अनमोल ठेवा व ऐवज कपाटबंद ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लॉकडाऊन काळात सदर सोसायटीचे उत्पन्नाचे स्त्रोत थांबल्याने तेथील कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने "एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई" येथील रिक्त पदे भरण्याबाबत व कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन विनाविलंब देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०७-१२-२०२१) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) एशियाटीक सोसायटी, मुंबई या संस्थेची स्थापना सन १८०४ मध्ये करण्यात आलेली आहे. सदरहू संस्था पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५० अन्वये नोंदणीकृत संस्था आहे.

एशियाटीक सोसायटी, मुंबई ही संस्था शासनाने स्थापित केलेली संस्था नाही. तसेच सदर संस्था उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या (शासनाच्या) अखत्यारीत/ कार्यकक्षेत नाही.

एशियाटीक सोसायटी, मुंबई या संस्थेची व्यवस्था ही त्यांच्या विश्वस्ताकडून पाहिली जाते. संस्थेतील कर्मचाऱ्यांची निवड, नियुक्ती, वेतन, सेवाशर्ती इ. विषयीचे अधिकार सदर संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे असतात.

एशियाटीक सोसायटी, मुंबई या संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी शासनाच्या अखत्यारीत/ कार्यकक्षेत नसल्याने सदरहू संस्थेतील पदाबाबत शासनाकडून कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

___

## राज्यातील विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना वेतन अदा करण्याबाबत

**(२०) ८५२१ (२०-०७-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.महादेव जानकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबईतील अनेक विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना कोविड-१९ अंतर्गत लॉकडाऊन सुरु झाल्यापासून शिक्षण संस्थांनी मागील वर्षभराचे वेतन दिले नसल्याचे दिनांक २५ जुलै, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, तसेच, ऑनलाईन शिक्षण सुरु असल्याने काही शिक्षकांना अतिरिक्त झाल्याचे सांगून कमी केल्यामुळे सदरहू शिक्षकांची व त्यांच्या कुटुंबियांची उपासमारीमुळे बिकट अवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांचे प्रलंबित वेतन तातडीने देवून अतिरिक्त शिक्षकांना पुन्हा सामावून घेण्यासाठी मुक्ता संघटनेने मा.मुख्यमंत्री, मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु आदिंकडे निवेदन देऊन अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील विनाअनुदानित महाविद्यालयांतील शिक्षकांना तात्काळ वेतन अदा करण्याकरीता तसेच अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना पुन्हा सामावून घेण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०६-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कायम विनाअनुदानित महाविद्यालयामधील कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित संस्थेची आहे.

यासंदर्भात कोविड-१९ च्या महामारीच्या काळात राज्यातील विद्यापीठ संलग्नित असलेल्या विनाअनुदानित महाविद्यालयांतील तसेच अनुदानित महाविद्यालयातील विनाअनुदानित विभागातील शिक्षकांच्या वेतनाबाबतच्या तक्रारी काही विद्यापीठांस प्राप्त झाल्या आहेत. तथापि, ऑनलाईन शिक्षण सुरू असल्याने शिक्षकांना अतिरीक्त झाल्याचे सांगून नोकरीवरून काढून टाकण्यात आले, हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

याबाबत मुफ्टा संघटनेकडून प्राप्त तक्रारीबाबत मुंबई विद्यापीठाच्या स्तरावरून कार्यवाही सुरू आहे. तसेच विनाअनुदानित महाविद्यालयांमधील शिक्षकांचे वेतन प्रलंबित राहू नये म्हणून मुंबई विद्यापीठाने दिनांक ३१/०३/२०२० व दिनांक २४/०७/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये संबधितांना विद्यापीठ स्तरावरून सूचीत केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धारावी येथील मॉर्निंग स्टार इंग्लिश स्कूलने नियमाचे उल्लंघन करुन प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतल्याबाबत

**(२१) ८५२७ (२०-०७-२०२१) श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे राज्यात कडक निर्बंध लागू केले असून मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करुन त्यांच्या परीक्षा घेण्यात येणार नाही, अशी घोषणा शनिवार, दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी केली असतानाही धारावी येथील मॉर्निंग स्टार इंग्लिश स्कूलच्या प्रशासनाने शासनाच्या निर्णयाचे उल्लंघन करुन दिनांक ५ मार्चपासून वेळापत्रकाप्रमाणे इयत्ता ३ रीच्या विद्यार्थ्यांना शाळेत बोलावून त्यांची परीक्षा घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शाळा प्रशासनाने शाळा बंद ठेवण्याचा आदेशाला तसेच पालकांच्या विरोधाला न जुमानता इयत्ता ३ रीच्या विद्यार्थ्यांच्या दिनांक ५ मार्च ते १२ मार्चपर्यंत लेखी परीक्षेचे नियोजन करुन दिनांक ५ मार्च रोजी इंग्रजी तसेच दिनांक ६ मार्च रोजी गणित विषयांची परीक्षा घेतली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालकांनी सदरहू प्रकार सामाजिक कार्यकर्त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री, अप्पर सचिव, शालेय शिक्षण विभाग, शिक्षण उपसंचालक कार्यालय आणि शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई यांच्याकडे तक्रार करुन संबंधित शाळेला परीक्षा सुरु असतानाच भेट देऊन परीक्षा बंद करायला लावली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित शाळा प्रशासन व दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-१२-२०२१)** : (१) हे खरे आहे.

मॉर्निग स्टार इंग्लिश स्कूल ही झोपडपट्टी परिसरात असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरीता जे विद्यार्थी अध्ययनात अक्षम आहेत किंवा ऑनलाईन पध्दतीत अध्ययनात अडथळे येत आहेत अशा विद्यार्थ्यांना एक ते दोन तासाकरीता कोविड-१९ च्या स्वच्छता व सुरक्षित अंतर या नियमावलीनुसार शाळेत बोलविण्यात आले होते व शिक्षक मित्र यांच्याव्दारे अध्यापनाचे वर्ग घेण्यात आले होते. विद्यार्थ्यांना अध्यापनात येणारे अडथळे समजून घेण्याकरीता विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आली होती. ज्या विद्यार्थ्यांकडे अद्ययावत मोबाईल फोन नाहीत. तसेच इंटरनेट सुविधा नाहीत अशा पालकांच्या विनंतीनुसार विद्यार्थ्यांना शाळेत प्रत्यक्ष शिक्षणाकरीता उपस्थित ठेवण्यात आले होते.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.

मॉर्निग स्टार इंग्लिश स्कूल या शाळेने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शाळेत उपस्थित ठेवणे किंवा विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे ही बाब दिनांक ५ मार्च, २०२१ ते दिनांक १२ मार्च, २०२१ या कालावधीतील असून सदर बाबतची

तक्रार ही शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, शिक्षण विभाग, मुंबई या कार्यालयास दिनांक ०६ एप्रिल, २०२१ रोजी प्राप्त झाली. त्यानुसार सदर शाळेस दिनांक ०६/०४/२०२१ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन परीक्षा घेणे तात्काळ बंद करण्याबाबत नोटीस देण्यात आली.

तसेच, दिनांक १३ एप्रिल, २०२१ रोजीच्या पत्रान्वये शाळेस महामारीच्या कालावधीत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपस्थित ठेवू नये याबाबत ताकीद देण्यात आली व शासनाच्या वेळोवेळी प्राप्त आदेशांचे पालन करुन विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण सुरु ठेवण्यात यावे, असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर-किन्हवली (जि.ठाणे) रस्त्यावरील गोठेघर ग्रामपंचायत हद्दीमधील खाजगी रुग्णालयाविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(२२) ८७३७ (१०-०६-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर-किन्हवली (जि.ठाणे) रस्त्यावरील गोठेघर ग्रामपंचायत हद्दीमध्ये ग्रामपंचायतीची परवानगी न घेता येथील वादग्रस्त असलेल्या खाजगी रुग्णालयामध्ये वापरण्यात आलेले “पीपीई किट” आणि मेडिकल साधनांची विल्हेवाट न लावता टाकण्यात आल्याचे दिनांक ६ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयास कोविडवर उपचार करण्याची कोणतीही परवानगी नसताना तेथे अनेक रुग्णांवर उपचार केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर खाजगी रुग्णालयाने “पीपीई किट” ची विल्हेवाट न लावता टाकल्यामुळे आजुबाजूच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी रुग्णालयाविरुध्द कारवाई करुन रुग्णालयाची मान्यता रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१०-१२-२०२१) :** (१), (२) व (३) शहापूर-किन्हवली रस्त्यावर, गोठेघर ग्रामपंचायत हद्यीत "लाईफ लाईन मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पीटल" या खाजगी रुग्णालयास दिनांक १९/०४/२०२१ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कोविड हेल्थ सेंटर म्हणून उपयोगात आणण्यास मान्यता दिली होती.

या रुग्णालयाने वापरलेला जैविक कचरा उदा.पीपीई किट व इतर वैद्यकीय कचरा रुग्णालयाच्या गॅलरीमध्ये जमा करण्यात येवून त्या कचऱ्याची विल्हेवाट प्रदूषण मंडळाच्या निकमानुसार मे. एसएमएस या संस्थंमार्फत करण्यात येत असल्याचे प्रमाणपत्र ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत गोठेघर यांनी दिले आहे.
(४) तालुका आरोग्य अधिकारी, शहापूर यांनी या प्रकरणी चोकशी केली असून त्यांना तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साकीनाका (मुंबई) परिसरातील गोदामात ऑक्सिजन सिलेंडरची साठेबाजी होत असल्याबाबत

**(२३) ८७६२ (२२-०६-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साकीनाका (मुंबई) परिसरात एका गोदामावर मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकून ऑक्सिजनचे ३१ हून अधिक सिलेंडर हस्तगत केल्याचे दिनांक १६ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना संकटाच्या काळात मास्क, सॅनिटायझर, इंजेक्शननंतर आता रुग्णांचे प्राण वाचविण्यास महत्वाची भूमिका बजाविणाऱ्या ऑक्सिजन सिलेंडरची साठेबाजी केली जात असून पोलिसांनी जप्त केलेल्या सिलेंडरची किंमत रुपये २ लाख ८५ हजार इतकी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) होय.

(२) व (३) कोरोना संकटाच्या काळात मास्क, सॅनिटायझर, इंजेक्शन तसेच ऑक्सिजन सिलेंडरचा काळाबाजार करणाऱ्या विरोधात गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांनी दिनांक १४/०५/२०२१ रोजी बॉम्बे क्रिएशन, कुर्ला, मुंबई येथे छापा मारुन दोन व्यक्तींना अटक केली.

सदर दोन व्यक्तींच्या विरोधात साकीनाका पोलीस ठाण्यात गु.रं.क्र.५०३/२१ कलम १८८ भा.दं.वि. सह कलम ३(२)(सी) जीवनावश्यक वस्तु अधिनियम सह कलम १८ (C), दंडनीय कलम २७(B)(ii) सह कलम १८(A) सह २८(क) सह २२(१)(cca), २२(३) औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम १९४० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांनी केलेल्या छाप्याच्या कारवाईत जप्त मुद्दे मालाची एकूण किंमत रुपये २ लाख ८५ हजार इतकी असून सदर संपूर्ण रक्कम व गुन्हेगार यांना पुढील तपासाकरीता साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(२४) ८८५२ (१०-०६-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यामध्ये ८०० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीने रुपये २ ते ३ लाखांचे मास्क व सॅनिटायझर खरेदी केल्याचे दर्शवून गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले असून जिल्हयातील अनेक ग्रामपंचायतींनी कोरोना काळात लाखो रुपयांच्या साहित्य खरेदीमध्ये गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी ग्रामविकास विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामविकास विभागाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी ग्रामसेवक, सरपंच व इतर अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०८-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रुग्णालयात गत वर्षभरात लागलेल्या आगींच्या घटनेबाबत

**(२५) ८९४७ (११-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.रामनिवास सिंह, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत वर्षभराच्या काळात भांडुप येथील ड्रीम्स मॉल व सनराईज रुग्णालय, मुंब्रा (जि.ठाणे) येथील प्राईम क्रिटीकेअर रुग्णालय व वेदांत रुग्णालय, विरार मधील विजय वल्लभ रूग्णालय, मानखुर्द, गोवंडी परिसरातील ४९ पैकी ३९ खाजगी नर्सिंग होम तसेच नागपूर-अमरावती रोडवरील वेलट्रिट कोविड रुग्णालय इत्यादी रुग्णालयांना तसेच संपूर्ण महाराष्ट्रात वाणिज्यिक व रहिवासी इमारतींना आगी लागण्याच्या घटना घडून मोठी जीवित व वित्तहानी झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील मॉल आणि रुग्णालयामधील अग्निप्रतिबंधक उपाययोजना विषयी अग्निशमन दलाने पाहणी केली असता मुंबईतील १,३२४ खाजगी व शासकीय रुग्णालयांपैकी ६६३ रुग्णालयांनी तर २९ नर्सिंग होम यांनी अग्निसुरक्षा नियम डावलल्याचे निदर्शनास आल्यामुळे अग्निशमन त्रुटी आढळलेल्या सर्व रुग्णालयांना व नर्सिंग होमना नोटीस पाठवून पुढील तीन महिन्यात आवश्यक ती पूर्तता न केल्यास कायदेशीर कारवाईस करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त सर्व ठिकाणी अचानक आग लागण्याची कारणे काय आहेत, याबाबतचा चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, चौकशी अहवालातील शिफारसींच्या अनुषंगाने या दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांचेवर पोलीसस्तरावर व महानगरपालिकास्तरावर कोणकोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी मा.न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्तीमार्फत चौकशी करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे तसेच मृत रुग्णांच्या कुटुंबियांना आर्थिक सहाय्य करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना अथवा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, भविष्यात अशा घटना पुन्हा उद्‌भवू नये याकरीता कोणती खबरदारी घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे. तथापि, मानखुर्द गोवंडी परिसरातील ४९ पैकी ३९ खाजगी नर्सिंग होम येथे आगीच्या दुर्घटनेची नोंद नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) भांडुप येथील ड्रीम मॉल व सनराईस रुग्णालयाला लागलेल्या आगीचे तपासाअंतीचे संभाव्य कारण “सदोष विद्‌युत प्रणाली” असे असून याबाबत सविस्तर अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने महानगरपालिकास्तरावर कारवाई करण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

विजय वल्लभ हॉस्पिटल, विरार येथे अतिदक्षता विभागातील वातानुकूलित यंत्रणेमध्ये बिघाड झाल्यामुळे आग लागली असून, सदर प्रकरणी निष्काळजीपणाबाबत सदर रुग्णालयाच्या व्यवस्थापकांविरुध्द दिनांक २३/०४/२०२१ रोजी गुन्हा दाखल केला आहे. तसेच पुढील कायदेशीर कार्यवाही पोलीस विभागामार्फत सुरु असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) विजय वल्लभ हॉस्पिटल, विरार येथील आगीच्या दुर्घटनेमध्ये मृत पावलेल्या रुग्णांच्या वारसदारांना प्रत्येकी रुपये ५ लाख व जखमी रुग्णांना प्रत्येकी रुपये ५० हजार इतकी आर्थिक मदत देण्यात आली आहे.

तसेच, सेंट्रल इलेक्ट्रिसीटी रेग्युलेशन २०१० अन्वये खाजगी रुग्णालयांनी वीज संच जोडणीचे परिक्षण शासन मान्यताप्राप्त नोंदणीकृत अभिकर्त्यामार्फत करुन घेणे व तद्‌नंतर विद्‌युत निरीक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्‌युत), महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणे अनिवार्य असून, त्याकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत संबंधित रुग्णालयांना नोटीसीद्‌वारे कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील कलम ३(३) अन्वये खाजगी रुग्णालयांचे अग्निसुरक्षा यंत्रणांचे परिक्षण शासन मान्यताप्राप्त नोंदणीकृत अभिकर्त्यामार्फत करणे अनिवार्य असून, अग्निसुरक्षा यंत्रणेचे परिक्षण व नुतनीकरण बाकी असलेल्या रुग्णालयांना नोटीसी देण्यात आल्या आहेत व त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे असे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नये याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णालये, प्रसुतीगृहे, नर्सिंग होम यांची अग्निसुरक्षा विषयक तपासणी करण्यात येऊन त्यात त्रुटी आढळून आलेल्या आस्थापनांना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत अग्निसुरक्षा विषयक त्रुटींची पूर्तता विहित मुदतीत करण्याची नोटीस बजावण्यात आल्या असून, त्रुटींची पूर्तता न करणाऱ्या आस्थापनांवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील तरतुदीअंतर्गत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रंगमंच कलाकार व कामगारांना आर्थिक सहाय्य देणेबाबत

**(२६) ९०३४ (१०-०६-२०२१) श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेशदादा पाटील, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेश कराड, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत टाळेबंदीमध्ये बंद झालेला नाट्यव्यवसाय अद्यापही सुरु न झाल्याने नाट्य कलाकारांच्याआर्थिक अडचणीत वाढ झाली आहे, तसेच शासनाकडून कठोर निर्बंध लागू केल्याने रंगमंच कामगारांची उपासमार सुरु असल्याची बाब ही माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाट्यसृष्टी बंद होऊन १३ महिन्याचा काळ उलटूनही या क्षेत्रावर अवलंबून असलेल्या कलाकार, सहकलाकार, रंगमंच कामगार, बुकिंग क्लार्क व सुरक्षारक्षक आदी कर्मचाऱ्यांना उपजिविकेसाठी शासनाकडून आर्थिक मदत म्हणून दरमहा रुपये ५ हजार मदत करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रंगमंच कलाकार व कामगारांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०७-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे शासनाकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून घातलेल्या निर्बंधांमुळे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन, नाट्यगृहे, चित्रपटगृहे बंद असल्याने कलाकारांना कला सादरीकरण व त्यापासून होणारे उत्पन्न यापासून वंचित राहावे लागले. तसेच या व्यवसायांशी संबंधितांनाही उत्पन्नापासून वंचित राहावे लागले.

(२) व (३) (अ) राज्यातील कोवीड १९ चा वाढता संसर्ग रोखण्यासाठी घ्यावयाची खबरदारी व त्यानुषंगाने करण्यात येणारे लसीकरण याबाबत प्रत्येक जिल्ह्यात प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रातील कलावंताव्दारे जाणिव जागृती करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला असून याबाबतचे आदेश शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य, दिनांक ८ ऑक्टोबर, २०२१ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. सदर कार्यक्रमासाठी रुपये ३.०० कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

(ब) कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर राज्यातील नाटयगृहे दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ पासून नियंत्रित स्वरुपात सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे, याबाबतचे आदेश शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग दिनांक ११ ऑक्टोबर, २०२१ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

(क) कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर प्रयोगात्मक कला प्रकारातील कलाकारांना व या क्षेत्रातील संस्थांना एकरकमी अर्थसहाय्य देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून याबाबतचे आदेश शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य, दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार राज्यातील ५६००० कलाकारांना प्रत्येकी एक रकमी रुपये ५,०००/- प्रमाणे रुपये २८.०० कोटी व ८४७ लोककला पथकांना रुपये ६.०० कोटी व त्यांच्या सर्वेक्षणासाठी व प्रशासकीय खर्च यासाठी रुपये १.०० कोटी असे एकूण रुपये ३५.०० कोटी एकरकमी अर्थसहाय्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक,धुळे यांच्या कार्यालयातील अनियमिततेबाबत

**(२७) ९०८४ (२०-०७-२०२१) श्री.किशोर दराडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, धुळे यांनी थकीत देयक, वैद्यकीय देयक, लोकायुक्त प्रकरणातील थकीत देयक अदा करताना संबंधित कर्मचाऱ्यांची आर्थिक फसवणूक केली अशा तक्रारी शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग यांच्याकडे दाखल झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व थकीत देयक अदा करताना शिक्षण संचालक यांची अंतरिम मंजुरी होती काय,

(३) असल्यास, किती प्रकरणासाठी शिक्षण संचालक यांनी मंजुरी दिली व किती प्रकरणाची देयके अदा करण्यात आली,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१०-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) संचालनालयामार्फत १६७ देयकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून शिक्षणाधिकारी स्तरावरुन देयके अदा करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथे प्रादेशिक तत्वावर सुरु करण्यात येणाऱ्या रक्ताच्या न्युक्लिअर एसिड टेस्टींग नॅट प्रकल्पाबाबत

**(२८) ९१२९ (१५-०७-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे प्रादेशिक तत्वावर सुरु करण्यात येणारा रक्ताच्या न्युक्लिअर एसिड टेस्टींग नॅट प्रकल्प अद्याप प्रलंबित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून सुपर स्पेशालिटी रूग्णालयात नॅट तपासणीसाठी जागा निश्चित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०७-१२-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व प्रायोगिक तत्वावर पथदर्शीय प्रकल्पातंर्गत (पायलट प्रोजेक्ट) न्युक्लीक एसिड टेस्टिंग सिस्टीम प्रकल्प सुरु करण्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात रूग्णवाहिका चालकांकडून आकारल्या जाणाऱ्या अतिरिक्त दराबाबत

**(२९) ९१८६ (१०-०६-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना महामारीमुळे रूग्णवाहिकांची आवश्यकता वाढली असून रूग्णवाहिकांच्या कमतरतेमुळे उपलब्ध रूग्णवाहिका चालक प्रशासन प्रति किलोमीटरसाठी निश्चित केलेल्या दरापेक्षा अतिरिक्त दर घेत असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांच्याकडे आलेल्या तक्रारीवरून निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात अधिकचे दर घेणाऱ्या रूग्णवाहिका चालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०९-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे कार्यालयाकडे सदर प्रकरणी ०३ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यांचेवर पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

१. MH-१२QW-७६७१ या वाहनावर मोटार वाहन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही पूर्ण केली असून सदर नोंदणीकृत वाहनमालक यांचेविरुध्द प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे कार्यालयाकडून बिबवेवाडी पोलीस स्टेशन येथे FIR क्र. ४८६/२० अन्वये दिनांक ०८/०७/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२. MH-०४H-०७८० या वाहनावर मोटार वाहन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही पूर्ण केली आहे.

३. MH-१२SX-०२६८ या वाहनावर मोटार वाहन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही पूर्ण केली आहे. तथापि, तक्रारदार यांनी दिनांक २८/१०/२०२१ रोजी जादा भाडे परत मिळाल्याने संबंधिताविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे लेखी निवेदन प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे कार्यालयास दिले असल्याने प्रकरण दप्तरी दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वृध्द कलावंतांना पेन्शन व मानधन मिळण्याबाबत

**(३०) ९२३२ (१७-०६-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जेष्ठ कलाकारांना दर महिन्याला शासनातर्फे मानधन दिले जात असून माहे जानेवारी, २०१९ पासून उक्त कलाकारांना मानधन मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन शासनाने गठीत केलेल्या सर्व वृध्द कलावंतांच्या पेन्शन व मानधन योजनेच्या जिल्हास्तरीय समित्या रद्द करुन दीड वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप नव्याने समितीची स्थापना न केल्यामुळे सोलापूर जिल्हयातील १२०० वृध्द कलावंत दरमहा मिळणाऱ्या मानधनापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात वृध्द कलावंत संघटनेने पाठपुरावा करूनही शासनाकडून निधी न मिळाल्यामुळे हे मानधन प्रलंबित असल्याचे जिल्हा प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन वृध्द कलावंतांच्या पेन्शन व मानधन योजनेच्या जिल्हास्तरीय समित्या नव्याने स्थापन करून मानधनापासून वंचित असलेल्या वृध्द कलावंतांना हक्काचे मानधन देणार आहे काय,

(५) तसेच, यासंदर्भात समित्या स्थापन न करण्याची, मानधन न देण्याची कारणे काय आहेत व कोरोना टाळेबंदीत कलाकारांना विशेष अर्थिक पॅकेज देण्यासंदर्भात शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०८-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

माहे जून, २०२१ पर्यंतचे मानधन सन्मानार्थी वृध्द साहित्यिक व कलावंत यांना अदा करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. संकीर्ण ८८२०/प्र.क्र.१५/ सां.का.४, दिनांक १८ जानेवारी, २०२० अन्वये सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या समितीतील अशासकीय कार्याध्यक्ष/ सदस्य यांच्या नेमणूका रद्द करण्यात आलेल्या आहेत. तथापि, सोलापूर जिल्ह्याची नवीन समिती स्थापन झालेली असून सदर समितीच्या दिनांक १५ जून, २०२१ च्या बैठकीत शासनाने ठरवून दिलेल्या दरवर्षी १०० च्या इष्टांकानुसार सन २०१९-२०२० साठी १०० व सन २०२०-२०२१ साठी १०० अशा २०० कलावंतांची निवड करण्यात आलेली आहे.

(३) माहे जून, २०२१ पर्यंतचे मानधन सन्मानार्थी वृध्द साहित्यिक व कलावंत यांना अदा करण्यात आलेले आहे.

(४) नवीन समिती स्थापन करण्यासाठी सर्व जिल्ह्याच्या मा.पालकमंत्री महोदय व समितीचे सदस्य सचिव यांना विनंती करण्यात आलेली आहे.

(५) समित्या स्थापन करण्याबाबत संबंधितांना कळविण्यात आलेले आहे. विशेष आर्थिक पॅकेजबाबत शासन सकारात्मक आहे.

---

## नेकनुर (ता.जि.बीड) येथील बाजार तळ्यावर बांधण्यात येणाऱ्या गाळयांच्या बांधकामाबाबत

**(३१) ९२८८ (२२-०६-२०२१) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेकनुर (ता.जि.बीड) येथील बाजार तळ्यावर बांधण्यात येणारे गाळयांचे बांधकाम थांबविण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड यांनी पंचायत समिती, गटविकास अधिकारी यांना दिले असूनही सदर बांधकाम चालू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाळेधारकांकडून घेतली जाणारी रक्कम व अभिलेख्यात दाखविण्यात येणारी रक्कम यात तफावत असल्याचे निदर्शनास आले असून विविध तक्रारींच्या अनुषंगाने उक्त बांधकामाला स्थगिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वीही गाळे देतांना ग्रामपंचायतीला आलेल्या रक्कमा आणि प्रत्यक्ष घेतलेल्या रक्कमा यात मोठी तफावत होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बाजाराचे वाढत्या स्वरुपामुळे जागा कमी पडत असून, ग्रामपंचायतीने नविन जागा उपलब्ध करुन देण्याऐवजी सदर जागेवरच अतिक्रमण करुन बांधकाम चालू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, गाळे बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे काय, कोणत्या विभागामार्फत तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे तसेच, सदर बांधकामास प्रशासकीय मान्यता कोणी दिली आहे,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०८-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) ग्रामपंचायत नेकनुर यांनी जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, बीड यांचेकडून सदर अंदाजपत्रक तयार करून घेतले असून त्यास बांधकाम विभाग क्र. १ जिल्हा परिषद, बीड यांनी सदर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता दिली आहे. सदर बांधकामास प्रशासकीय मान्यता ग्रामपंचायत नेकनुर यांनी दिली आहे.
(६) होय, सदर प्रकरणी जिल्हा परिषदेकडून चौकशी चालू आहे.

---

## नागपूर येथील राज्यातील महाविद्यालयांमधील प्राध्यापकांचे व कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन अदा करण्याबाबत

**(३२) ९३१० (२०-०७-२०२१) श्री.प्रवीण दटके : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ३६९० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांनी सेवेत असणाऱ्या प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक व अन्य कर्मचाऱ्यांचे वेतन मागील किमान १ वर्षापासून प्रलंबित ठेवल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २ हजार प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक व अन्य कर्मचारी आर्थिक संकटात सापडले असून विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे पैसेही शासनाने अद्याप वर्ग केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन अदा करुन विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा प्रश्न मार्गी लावण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०८-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

नागपूर विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी संबंधित विभागीय सहसंचालकांच्या मागणीनुसार संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी एकंदरीत रू १५९ कोटी इतके अनुदान वितरीत केले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क हे लाभ देण्यात येतात. ज्यामध्ये परीक्षा शुल्काचे लाभ हे संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खातेवर जमा करण्यात येतात तसेच शिक्षण शुल्काचे लाभ हे संबंधित महाविद्यालयाच्या खात्यावर जमा होतात. सदरहू योजनेची राज्यशासनाच्या महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन अंमलबजावणी करण्यात येते.

महाडीबीटी पोर्टलवरून नागपूर विभागासाठी सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ साठी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीकरीता एकूण रुपये ५४.०६ लाख इतकी रक्कम वितरीत केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) उपजिल्हा रूग्णालयासह अन्य शासकीय रूग्णालयातून कोरोना बांधित रूग्णांना उत्तम आरोग्य सेवा मिळण्याबाबत

**(३३) ९५९० (१७-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) उपजिल्हा रूग्णालयात नऊ व्हेंटिलेट गत वर्षभर विनावापर असून सदर उपजिल्हा रूग्णालयाच्या कोविड सेंटरमध्ये पूर्णवेळ टेक्निशियन तसेच फिजिशियन डॉक्टर नसल्याने व्हेंटिलेटर कार्यान्वित होऊ शकले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपजिल्हा रुग्णालयात दोन व्हेंटिलेटर जोडले असले तरीही सद्य:स्थितीत केवळ एकच व्हेंटिलेटर कार्यान्वित असल्याने व्हेंटिलेटर आवश्यक असलेल्या रूग्णांना दुसऱ्या रुग्णालयात स्थलांतरित करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, गतवर्षी पीएम केअर फंडातून संबंधित रुग्णालयास १० व्हेंटीलेटर प्राप्त झाले असून त्यातील ६ व्हेंटीलेटर प्रसुती विभागात, ४ व्हेंटीलेटर कोविड केअर सेंटरमध्ये तर १ अडगळीच्या खोलीत विनावापर आहे, त्यातील २ व्हेंटीलेटर कार्यान्वित करण्यात आले असून सध्या त्यापैकी एकच व्हेंटीलेटर कार्यान्वित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सावंतवाडी शहरातील एका रूग्णाला माहे मे, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात कोरोना उपचारासाठी उपजिल्हा रूग्णालयामध्ये दाखल करण्यात आले असता त्याला ऑक्सिजनची गरज भासल्याने ओटू बेडवर ठेवण्यात आले मात्र ऑक्सिजन पातळी खालावत गेल्याने व्हेंटीलेटर कार्यान्वित नसल्याने त्या रूग्णाला कार्डियाक रुग्णवाहिकेमधून रुपये ५० हजार खर्च करून पनवेल येथे खाजगी रूग्णालयात स्थलांतरित करण्याची वेळ आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शासकीय रूग्णालयात व्हेंटीलेटरबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी सिंधुदुर्ग जिल्हावासियांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सावंतवाडी उपजिल्हा रूग्णालयासह अन्य शासकीय रूग्णालयातून कोरोना बाधित रूग्णांना व्हेंटीलेटरसह चांगली आरोग्यसेवा मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१६-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, सावंतवाडी येथे पी.एम.केअर योजनेतून १० व्हेंटीलेटर ऑगस्ट, २०२० मध्ये प्राप्त झाले आहेत. तसेच या रुग्णालयामध्ये २ फीजिशियन उपलब्ध आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

पी.एम. केअर फंडातून १० व्हेंटीलेटर प्राप्त झाले असून सर्व व्हेंटीलेटर कार्यान्वित करण्यात आले आहेत.

(४) हे अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय, सावंतवाडी येथील गंभीर रुग्णांना पुढील उपचारार्थ १०८ च्या रुग्णवाहिकेतून जिल्हा रुग्णालय, सिंधूदूर्ग येथे संदर्भीत करण्यात येते. तथापि, काही वेळा रुग्णाचे नातेवाईक स्वेच्छेने रुग्णाला त्यांचे सोईनुसार पुढील उपचारार्थ जिल्हयातील किंवा जिल्हाबाहेरील इतर रुग्णालयात खाजगी रुग्णवाहीकेमधून घेऊन जातात.

(५) प्राप्त अहवालानुसार जिल्हा रुग्णालय, सिंधूदूर्ग येथे ५२ व्हेंटीलेटर, उपजिल्हा रुग्णालय, कणकवली येथे ८ व्हेंटीलेटर, उपजिल्हा रुग्णालय, सावंतवाडी येथे १० व्हेंटीलेटर, महिला व बाल रुग्णालय, कुडाळ येथे ७ व्हेंटीलेटर उपलब्ध आहेत.

(६) सिंधूदूर्ग जिल्हयात शासकीय व खाजगी मिळून ०६ डीसीएच असून ४७३ खाटा असून त्यामध्ये ३७१ ऑक्सिजनच्या व ५६ अतिदक्षता/व्हेंटीलेटरच्या खाटा कार्यरत आहेत. सिंधूदूर्ग जिल्हयात शासकीय व खाजगी मिळून १२ डीसीएचसी असून त्यामध्ये ३०३ खाटांची संख्या आहे. त्यामध्ये २४० खाटा ऑक्सिजनच्या व २० अतिदक्षता/व्हेंटीलेटरच्या खाटा कार्यरत आहेत.

कोवीड प्रतिबंधात्मक उपाययोजना व बाधितांवर उपचारासाठी जिल्हयातील सर्व कोवीड नामनिर्देशित रुग्णालयांमध्ये उपलब्ध वैद्यकीय सामग्री तांत्रिक मनुष्यबळ व औषधी यांचा पूर्णपणे वापर करून कोवीड रुग्णांना रुग्णसेवा दिल्या जातात.

---

## कोरोना महामारीमध्ये जलसंपदा विभागावर मंजूर तरतुदीपेक्षा अतिरिक्त खर्च झाल्याबाबत

**(३४) ९७५४ (१७-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य घटनेनुसार सार्वजनिक आरोग्य हा विषय राज्य सूचीत असून त्यानुषंगाने कोरोनावर नियंत्रण करण्याची जबाबदारी शासनाची असतानाही, स्थानिक स्वराज्य संस्था जसे की ग्रामपंचायत, नगरपालिका इत्यादींना कोणतीही मदत दिली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना संकटाची तीव्रता लक्षात घेता दिनांक ३१ मार्च, २०२० नंतर प्रामुख्याने राज्यात तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर व्हेंटीलेटर खरेदी, ऑक्सिजनयुक्त बेडची व्यवस्था व आरोग्य सुविधा इत्यादीवर सर्वाधिक खर्च करणे अपेक्षित असताना, जलसंपदा विभागावर मंजूर तरतूदीपेक्षा अतिरिक्त खर्च करण्यात आला असून स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी न दिल्यामुळे महाराष्ट्रात कोरोनाचा सर्वात जास्त संसर्ग होऊन व्हेंटीलेटर अभावी तर वेळेत ॲम्ब्युलन्स न मिळाल्याने सर्वाधिक म्हणजे ४२००० पेक्षा अधिक मृत्यू झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलसंपदा विभागावर मंजूर तरतूद रुपये ३२१४ कोटी असताना रुपये ३६१४ कोटी खर्च करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आरोग्य सुविधांवर निधी खर्च न करता जलसंपदा, सहकार व अन्न व नागरी पुरवठा इत्यादी विभागांना निधी देत असताना स्थानिक स्वराज्य संस्थांना कोरोना नियंत्रणासाठी निधी न देण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने झालेल्या अनियमिततेची चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१४-१२-२०२१) :** (१) स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्य शासनाकडून देय निधी (उदा. वस्तु व सेवा कर आणि जकात करामुळे द्यावयावी भरपाई) व्यतिरिक्त १५ व्या वित्तीय आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक १ एप्रिल, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२१ या कालखंडात केंद्र शासनाकडून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी राज्याला बेसिक आणि टाईड ग्रँट या दोन प्रकारचा प्राप्त निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

या व्यतिरिक्त जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२०-२१ करीता उपलब्ध होणाऱ्या तरतूदीपैकी कोविड-१९ विषाणूच्या प्रादूर्भावावरील अनुज्ञेय विशेष उपाययोजनाकरीता व सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियमित योजना तसेच जिल्हास्तरीय आरोग्य विषयक सुधारणांच्या बळकटीकरणासाठी निधी उपयोगात आणण्यास मान्यता देण्यात आली होती. तसेच कोविड-१९ विषाणूमुळे पसरलेली रोगराई नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) मधून सर्व जिल्ह्यांना निधी वितरीत करण्यात आला होता. सदर राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) मधून वितरीत निधी गरजाप्रमाणे आवश्यक बाबींवर खर्च करण्यास जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

(२) राज्य शासकीय रुग्णालयातील उपलब्ध व्हेंटीलेटर्स शिवाय CSR मधून उपलब्ध व्हेंटीलेटर्स व केंद्र शासनाकडून तातडीची मदत म्हणून उपलब्ध व्हेंटीलेटर्स तसेच स्थानिकस्तरावर जिल्हानिहाय खरेदी केलेले व्हेंटीलेटर्स याशिवाय खाजगी रुग्णालयातील नियमन करण्यात आलेल्या ८०% खाटांमध्ये व्हेंटीलेटर्स सुविधेच्या खाटाही रुग्णांच्या उपचारासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. ऑक्सिजनचा पुरवठा पुरेशा प्रमाणात व्हावा, यासाठी जंबो सिलिंडर्स, बी-टाईप सिलिंडर्स आणि डयुरा सिलिंडर्स उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. राज्यातील २६ जिल्हयांमध्ये ऑक्सिजन टँक सुरु करण्यात आले आहेत.

केंद्र सरकारकडून राज्याला ४,३८४ व्हेंटीलेटरर्स प्राप्त झाले आहेत. राज्यात पुरेशा प्रमाणात ऑक्सिजन बेडस आणि व्हेंटीलेटरर्स उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

(३) नाही.

जलसंपदा विभागासाठी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाजानुसार रुपये १५,१९३ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता तर रुपये १२,८६२ कोटी इतके सुधारित अंदाज मंजूर होते. त्यापैकी वर्षाअखेर रुपये १०,५८० कोटी इतका निधी खर्च झाला असल्याचे अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि सनियंत्रण प्रणालीनुसार दिसून येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सात ते बारा आसनी प्रवासी सेवा (मॅक्सीकॅब) सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३५) ९७९० (१५-०७-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सात ते बारा आसनी प्रवासी सेवा (मॅक्सीकॅब) अनधिकृतपणे सुरु असून सदर मॅक्सीकॅब सेवा अधिकृत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी दिनांक ९ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.परिवहन मंत्री यांच्या दालनात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत याबाबतच्या धोरणासंदर्भात अतिरिक्त पोलीस महासंचालक (वाहतूक) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मॅक्सीकॅब सेवा सुरु झाल्यास एस.टी. महामंडळाचे फार मोठे आर्थिक नुकसान होणार असल्यामुळे मॅक्सीकॅब सेवेला एस.टी. कामगार संघटनानी विरोध दर्शविला असून यासंदर्भात महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटना यांनी मा.परिवहन मंत्री यांना सविस्तर निवेदन सादर केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बैठकीतील निर्णयानुसार समिती स्थापन करण्यात आली आहे काय, समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एस.टी. महामंडळ आर्थिकदृष्टया सक्षम करण्याकरीता तसेच राज्यात दूरवर एस.टी. बस सेवा जनतेस मिळण्यासाठी तसेच मॅक्सीकॅबला कामगार संघटनांचा असलेला विरोध या सर्व बाबी विचारात घेता याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०९-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मॅक्सीकॅब योजनेसंदर्भात धोरणाचा आढावा घेण्यासाठी अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, तथापि, अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांच्या अध्यक्षतेखालील समितीऐवजी यापूर्वी भाडेदर ठरविण्यासाठी ज्याप्रमाणे खटुआ समिती नियुक्ती केली होती तशा स्वरुपाची समिती स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(२) निवेदन आढळून आले नाही.

(३) मॅक्सीकॅब संदर्भात धोरणाचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन करणेची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत असलेल्या व नंतर १००% अनुदान मिळालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणेबाबत

**(३६) ९८६९ (२०-०७-२०२१) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शंभर टक्के अनुदान नसलेल्या शाळेच्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना नाकारण्यात आली असून इतर शासकीय क्षेत्रात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नवी पेन्शन योजना (डीसीपीएस) सुरू करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शाळेमध्ये कार्यरत असलेल्या परंतु १००% अनुदान नसलेल्या शाळेला १००% अनुदान नव्हते म्हणून जुनी पेन्शन योजना नाकारण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत असलेल्या परंतु १००% अनुदान नसलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-१२-२०२१) :** (१) व (२) वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे. मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती या विभागाच्या दिनांक २९/११/२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली आहे.
(३) राज्यातील सर्व खाजगी अनुदानित, विनाअनुदानित, अंशत: अनुदानित व तुकड्यांवर ०१/११/२००५ पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत अभ्यास करण्यासाठी अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४/०७/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये संयुक्त समिती गठीत करण्यात आली होती. सदर संयुक्त समितीने दिनांक ०३/०७/२०२० रोजी शासनास अहवाल सादर केला आहे. या अहवालातील शिफारशींवर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात जात प्रमाणपत्र समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्याने सेवा समाप्त केलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेणेबाबत

**(३७) १०००८ (२२-०६-२०२१) श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जात प्रमाणपत्र समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्याने सेवा समाप्त केलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेणेबाबतचे निवेदन विधानपरिषद सदस्यांनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री महोदयांना माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनात नमुद केलेल्या संदिप सखाराम वस्कर यांचे जात प्रमाणपत्र जात प्रमाणपत्र समितीने अवैध ठरविल्याने त्यांची सेवा समाप्त करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या हजारो कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर सेवेत कायम ठेवले असून त्याप्रमाणे संदिप सखाराम वस्कर यांना सेवेत कायम ठेवण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०८-१२-२०२१) :** (१) याबाबतचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) व (३) श्री.संदिप सखाराम वस्कर यांचे अनुसुचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्याने त्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या होत्या. तथापि, अनुसुचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर नेमणूक देण्याबाबत निर्णय घेण्यात आला असल्याने शासनाच्या दिनांक १३ सप्टेंबर, २०२१ च्या आदेशान्वये श्री.संदिप वस्कर यांची सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अण्णासाहेब पाटील विकास महामंडळाच्या व्याज परतावा योजनेकरीता बँकांनी कर्ज पुरवठा करण्यास नकार दिल्याबाबत

**(३८) १०१२० (२०-०७-२०२१) श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने मराठा समाजातील युवकांसाठी निर्माण केलेल्या अण्णासाहेब पाटील विकास महामंडळाद्वारे विविध योजना राबविण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनांपैकी व्याज परतावा योजनेकरीता राज्यातील शेकडो अर्जदारांना मंडळाने एलओआय देऊनही अनेक अर्जदारांना राज्यातील बँकांनी कर्ज पुरवठा करण्यास नकार दिला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (०२-१२-२०२१)** : (१) हो, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.

महामंडळाने वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत आजपर्यंत ७७,३६२ इतक्या उमेदवारांना व्यवसायाकरीता पात्र असल्याबाबतचे पात्रता प्रमाणपत्र (LOI) ऑनलाईन स्वरुपात दिले आहे. सदर पात्रता प्रमाणपत्र (LOI) देण्याची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन स्वरुपाची असून वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत राज्यातील बँकांनी महामंडळाच्या लाभार्थ्यांना आतापर्यंत रुपये २०५६ कोटीचे कर्ज वाटप केलेले आहे. बँकांनी लाभार्थ्यांना दिलेल्या कर्जावरील व्याजाचा परतावा महामंडळ करीत आहे. त्यानुसार आजतागायत २३,६७५ लाभार्थ्यांना रुपये १६१ कोटी व्याज परतावा स्वरुपात निधी वाटप केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील विविध संस्थांमधील बदली कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी शासन सेवेत सामावून घेण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३९) १०१७९ (२०-०७-२०२१) श्री.विलास पोतनीस : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ४९६५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील विविध संस्थांमधील कार्यरत असलेल्या ९२५ बदली कर्मचाऱ्यांपैकी ज्या कर्मचाऱ्यांची सेवा दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार न्यायालयाच्या आदेशाशिवाय सलग १० वर्षे व प्रत्येक

आर्थिक वर्षात २४० दिवस झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी शासन सेवेत सामावून घेण्याच्या प्रस्तावाची शासनाकडून छाननी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाच्या छाननी अंती शासनाने याबाबत कोणता निर्णय घेतला आहे,
(३) अद्यापपर्यंत उक्त प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०८-१२-२०२१) :** (१) या विभागाच्या दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार ९२५ बदली उमेदवारांच्या सेवाविषयक कागदपत्रांची छाननी शासन स्तरावरुन करण्यात आली नसून वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या स्तरावर करण्यात आलेली आहे.
(२) व (३) प्रस्तुत विषयाबाबत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात व मा.उच्च न्यायालयात प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्याने या प्रकरणी सद्य:स्थितीत शासन स्तरावरुन कोणतीही कार्यवाही करणे उचित होणार नाही.

---

## कोरोना संसर्गामुळे मृत्यूमुखी पडलेल्या कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्याबाबत

**(४०) १०१९२ (२९-०९-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या वीज कंपन्यांमधील रिक्त असलेल्या नियमित पदांच्या जागी गत १५ ते २० वर्षांपासून ३२ हजारांहून अधिक कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून कोरोना संसर्गामुळे आजमितीपर्यंत ४० कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मृत पावलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना संबंधित वीज कंपन्यांनी नुकसान भरपाई दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील वीज कंपन्यांतील मृत पावलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-११-२०२१) :** (१) राज्यातील महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या तीन वीज कंपन्यांमधील रिक्त असलेल्या नियमित पदांच्या जागी एकूण ३९,७५३ इतके कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून त्यापैकी आजमितीपर्यंत १२४ कंत्राटी कर्मचाऱ्यांचा करोना संसर्गामुळे मृत्यू झाला आहे.
(२) व (३) अ) महावितरण कंपनीमध्ये माहे जून, २०२१ अखेर कोरोना संसर्गामुळे मृत झालेल्या ३८ कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी २६ कंत्राटी कामगारांच्या कुटुंबीयांना सानुग्रह सहाय्य अदा करण्यात आले आहे. उर्वरीत १२ मृत कंत्राटी कामगारांच्या कुटुंबीयांना सानुग्रह सहाय्याची रक्कम अदा करण्याबाबत महावितरण कंपनी स्तरावरून कार्यवाही सुरू आहे.

ब) महानिर्मिती कंपनीत माहे जून, २०२१ पर्यंत करोना संसर्गामुळे मृत झालेल्या ६६ कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी २५ कंत्राटी कामगारांच्या कुटुंबीयांना सानुग्रह सहाय्य अदा करण्यात आले आहे. ३८ मृत कंत्राटी कामगारांच्या वारसदारांना सानुग्रह सहाय्य अदा करण्याची कार्यवाही कंपनीस्तरावरून सुरू आहे. ३ प्रकरणे अटी व शर्तींची पुर्तता न केल्यामुळे अपात्र ठरली आहेत.

क) महापारेषण कंपनीतील एकूण २० मृत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी ४ मृत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वारसांना सानुग्रह सहाय्य अदा करण्यात आले आहे. उर्वरीत प्रकरणांमध्ये मृत कंत्राटी कामगारांच्या वारसदारांना सानुग्रह सहाय्य अदा करण्याची कार्यवाही कंपनी स्तरावरून सुरू आहे.
(४) लागू नाही.

---

## राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अद्ययावतीकरण करण्याबाबत

**(४१) १०१९५ (०१-१०-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जागतिक औद्योगिक क्षेत्राकरीता कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे (आय.टी.आय.) अद्ययावतीकरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, तसेच, सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी किती कालावधीत होणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अद्ययावतीकरण करण्याच्या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (०९-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यातील ४१९ (अस्तित्वातील ४१७ व प्रस्तावित २) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे आधुनिकीकरण करणे व राज्यातील ०६ उच्च श्रेणी कौशल्य विकास केंद्र (Center of Excellence) ०३ कृषीविषयक उच्च श्रेणी कौशल्य विकास केंद्र स्थापन करणे प्रस्तावित आहे. या प्रकल्पांतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील उपकरणे आणि तंत्रज्ञान साधनांचे आधुनिकीकरण करणे, अद्ययावत प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी प्रशिक्षण सामग्री व सुविधा वर्धित करणे, समुपदेशन आणि प्लेसमेंटची सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून देणे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्प ३ वर्षाच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने राबविणे प्रस्तावित आहे. अशा प्रकारचा प्रस्ताव टाटा टेक्नॉलॉलीमार्फत शासनास प्राप्त झालेला आहे.

(३) शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावास मा.मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याकरीता प्रस्ताव मा.मंत्रिमंडळासामोर सादर करण्याची आवश्यक ती कार्यवाही शासनस्तरावरून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील महाविद्‌यालयामध्ये सेवानिवृत्त प्राध्यापकांना निवृत्तिवेतन सुरु करण्याबाबत

**(४२) १०२०६ (०१-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक २४/१०/१९९२ ते दिनांक ०३/०४/२००० या कालावधीमध्ये व त्यानंतर एम.फिल. ह्या शैक्षणिक अर्हता प्राप्त अध्यापकांच्या संदर्भात नियुक्ती, पदोन्नती (कॅस) तसेच वेतनवाढीबाबत शासनाने निर्गमित केलेले पत्र व मा.उच्च न्यायालयाने दिलेले निकाल यामध्ये विसंगती असल्याने शासनाने यावर खुलासा करण्याची मागणी नागपूर विभागाचे शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक २१/०३/२०२१ रोजी निवेदन पाठवून केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, केव्हापर्यंत कार्यवाही होणे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०६-१२-२०२१) :** (१) व (२) यासंदर्भात लोकप्रतिनिधी तसेच विविध शिक्षकीय संघटनांची शासनास निवेदने प्राप्त होतात. मात्र याबाबत नमूद करण्यात येते की, विद्‌यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १९/०९/१९९१ च्या अधिसूचनेनुसार अकृषी विद्‌यापीठे व संलग्नित महाविद्‌यालयात अध्यापक म्हणून नियुक्त होण्यासाठी नेट/सेट अर्हता विहित केलेली आहे. सदर शैक्षणिक अर्हता शासन निर्णय दिनांक २३/१०/१९९२ नुसार राज्यातील अकृषी विद्‌यापीठे व संलग्नित महाविद्‌यालयांना लागू करण्यात आलेली आहे.

तद्नंतर दिनांक १४/०६/२००६ च्या अधिसूचनेनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने अधिव्याख्याता म्हणून नियुक्त होण्यासाठी नेट/सेट शैक्षणिक अर्हता अनिवार्य केली व जर उमेदवाराने एम.फील. पदवी धारण केलेली असल्यास त्यांना नेट/सेट मधून सुट राहील अशी तरतुद केलेली आहे. सदर तरतुद विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ०१/०६/२००९ च्या अधिसूनेन्वये काढून घेतलेल्या आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १४/०६/२००६ च्या अधिसूचनेतील तरतुदी या केवळ दिनांक १४/०६/२००६ वा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना लागू होतील. सदर तरतुदी दिनांक १४/०६/२००६ पूर्वी नियुक्त/कार्यरत अधिव्याख्यात्यांना सदरहू तरतुदी लागू होणार नाहीत. त्यामळे एम. फील. च्या अर्हतेवर नेट/सेट मधून सुट मिळणार नाही.

दिनांक २३/१०/१९९२ ते दिनांक ०३/०४/२००० कालावधी नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांनी त्यांच्या सेवाकालावधीत विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण केली नाही, अशा अध्यापकांच्या सेवा शासन निर्णय दिनांक २७/०६/२०१३ अन्वये काही अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन निर्णयाच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदरहू शासन निर्णयाच्या विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई तसेच औरंगाबाद व नागपूर खंडपीठ येथे नेट/सेट अर्हतेबाबत दाखल असलेल्या सर्व याचिकांवर एकत्रित सुनावणी घेण्याबाबत मा.सर्वोच्य न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार या.क्र.२०८२/२०१३ व इतर समविषयाच्या याचिकांवर दिनांक २३/१२/२०१५ रोजी एकत्रित सुनावणी झाली व त्यामध्ये शासन निर्णय दिनांक २७/०६/२०१३ वैध ठरविला आहे. मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल झालेल्या असून प्रकरण सद्य:स्थिती न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४३) १०२२८ (२७-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य सुविधा हा सर्वात महत्त्वाचा घटक बनलेला असताना सार्वजनिक आरोग्य विभागात हजारो पदे रिक्त असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी आरोग्य विभागातील १६ हजार पदांमध्ये "क" आणि "ड" संवर्गातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची घोषणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१६-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागातील गट क संवर्गातील २७५२ रिक्त पदे व गट ड संवर्गातील ३४६६ रिक्त पदे असून उर्वरीत पदे ही ग्रामविकास विभागातंर्गत असलेल्या आरोग्य विभागाशी संबंधित आहेत.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागातील गट क व ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. गट क संवर्गातील रिक्त पदांसाठी दिनांक ०६/०८/२०२१ रोजी व गट ड संवर्गातील रिक्त पदांसाठी दिनांक ०७/०८/२०२१ रोजी जाहिरात देण्यात आली आहे.

(४) कार्यवाही सुरू आहे.

---

## नक्षलग्रस्त आदिवासी क्षेत्रात असणाऱ्या विजाभज आश्रमशाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता पूर्ववत लागू करण्याबाबत

**(४४) १०२६९ (०६-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलग्रस्त आदिवासी व संवेदनशील क्षेत्रातील खाजगी अनुदानित शाळेत, आदिवासी आश्रमशाळेत व जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये कार्यरत सर्व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता लागू केलेला आहे, परंतु विजाभज आश्रमशाळांमध्ये कार्यरत शिक्षक/कर्मचाऱ्यांना यापुर्वी लागू असलेली एकस्तर पदोन्नती व प्रोत्साहन भत्ता माहे, फेब्रुवारी, २०२० पर्यंत मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १३ मार्च, २०२० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये विजाभज आश्रमशाळेतील शिक्षक/कर्मचारी बदली पात्र नसल्याने एकस्तर पदोन्नती व प्रोत्साहन भत्ता लागू करता येणार नाही असे आदेश दिले त्यामुळे विजाभज आश्रमशाळेतील शिक्षक/कर्मचाऱ्यांना माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान एकस्तर पदोन्नतीचा लाभ व प्रोत्साहन भत्ता बंद करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शासन निर्णय रद्द करून विजाभज आश्रमशाळेतील शिक्षक/कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार १५ टक्के किमान २०० रूपये व कमाल १५०० रूपये या प्रमाणात किमान प्रोत्साहन भत्ता पूर्ववत लागू करण्याची मागणी संघटनेच्यावतीने व नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक १२ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने विजाभज आश्रमशाळेतील शिक्षक/कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार प्रोत्साहन भत्ता पूर्ववत लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०८-१२-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे बदलीपात्र नसल्यामुळे सदर कर्मचारी एकस्तर पदोन्नती/ प्रोत्साहन भत्त्यासाठी पात्र नाहीत, असे अभिप्राय शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग आणि शालेय शिक्षण विभागाकडून या विभागास प्राप्त झाल्यानुसार सदर अभिप्राय/ सहमती आधारे शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग दिनांक १३/०३/२०२० अन्वये या विभागाच्या प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक/ विद्यानिकेतन/ ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळांमध्ये कार्यरत असलेल्या नक्षलग्रस्त/ आदिवासी क्षेत्रात असणाऱ्या आश्रमशाळांतील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता/ एकस्तर पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय नसल्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तुमसर (जि.भंडारा) येथे शासकीय रुग्णालयात भरती होणाऱ्या रुग्णांकडून शुल्क आकारल्याबाबत

**(४५) ३५९०३ (०२-०१-२०१८) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुमसर (जि.भंडारा) येथे शासकीय रुग्णालयात भरती होणाऱ्या रुग्णांकडून प्रती दिवस २०/- रुपये शुल्क आकारणी करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत जिल्हा परिषद सदस्यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुर्गम भागातील गरीब रुग्णांना सदर शुल्क न परवडणारे असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) तक्रार केल्याचे निवेदन ह्या विभागात आढळून आले नाही.
(३) शासन निर्णय दिनांक २८ डिसेंबर, २०१५ अन्वये १७ संवर्गातील रुग्णांना निशुल्क सेवा मिळण्याबाबत सवलत अंतर्भुत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे -देवडे अधिष्ठीवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील जि.प. शाळा क्र. १ च्या जागेबाबत

**(४६) ३७३१० (१४-१२-२०१७) श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे देवडे अधिष्ठीवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील जि.प. शाळा क्र. १ च्या आवाराची १० फूट जागा कंपाऊंड वॉल बांधताना जि.प. च्या परवानगीशिवाय मूळ हद्दीच्या बाहेर खाजगी वापरासाठी सोडण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक ग्रामस्थ यांनी दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे पत्राद्वारे सदर बाब निदर्शनास आणूनही सदर ग्रामपंचायतीवर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ग्रामपंचायतीने अशा प्रकारे जि.प. शाळा क्र. १ च्या आवारात खाजगी सभामंडप उभारुन मंडपाला स्वतःच्या आईचे “शारदा मंच” असे द्विअर्थी नाव दिल्याचे तसेच शाळेच्या मुख्य गेटसमोर खाजगी अनधिकृत शेड बांधून विद्यार्थ्यांना/ मतदारांना शाळेत प्रवेशास अडचणी करणे, खोटे रहिवाशी दाखले देणे, तंटामुक्ती व हगणदारी मुक्त गाव नसताना खोटे दाखले देऊन पुरस्कार मिळविणे, मुख्यालयी न राहणाऱ्या शिक्षकांना खोटे रहिवाशी दाखले देणे, ग्रामपंचायत राबवित असलेल्या अनेक योजनेत बोगस कारभार करुन शासनाची दिशाभूल करुन मोठ्या प्रमाणात गैरप्रकार केल्याचे उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अनेक प्रकरणात दोषी आढळून आलेल्या ग्रामपंचायतीवर गुन्हा दाखल करुन बरखास्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२६-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

मौ. देवडे अधिष्ठीवाडी संगमेश्वर (देवरुख) जि.रत्नागिरी येथील जि.प. शाळा क्र. १ च्या आवारातील १० फुट कंपाऊंड वॉल बांधताना जि.प. परवानगीशिवाय मूळ हद्दीच्या बाहेर खाजगी वापरासाठी जागा सोडण्यात आल्याबाबतची तक्रार दिनांक ०४/१०/२०१७ रोजी श्री.दिपक बेर्डे व प्रदीप बेर्डे, ग्रामस्थ, मु.पो.देवडे यांनी तत्कालीन मा.मंत्री, ग्रामविकास यांच्याकडे केली आहे.

शाळेचे एकूण क्षेत्र ०.२२ हे. इतके आहे. सदरची जागा ही जिल्हा परिषदेच्या मालकीची आहे. शाळेच्या आवारातूनच ग्रामस्थांच्या येण्या-जाण्यासाठी रस्ता जात होता. कंपाऊंड वॉल बांधल्यानंतर ग्रामस्थांचा रस्ता बंद होत असल्याने वाडी अधिष्ठ कांगणेवाडी, वाणीवाडी ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समिती यांच्यामध्ये बैठक होऊन वाडी अधिष्ठीतील लोकांना जाणे-येणेसाठी शाळेच्या आवारातून वाट न देता बाहेरील बाजूने वाट (शाळेच्या कंपाऊंडच्या बाहेरुन) देणेबाबत ठरल्यानुसार, जागेची मोजणी करुन हद्द कायम केल्यावर त्यानुसार ग्रामपंचायतीने मंजूरी दिल्यानंतर कंपाऊंडवॉलचे बांधकाम पूर्ण केले आहे. सदर बांधण्यात आलेला १० फुट रुंद रस्ता हा कंपाऊंड वॉलच्या बाहेरुन करण्यात आला असून ही रस्त्याची जागा शाळेच्या एकूण ०.२२ हे. पैकी आहे. तथापि, जिल्हा परिषदेची पूर्वपरवानगी न घेता ग्रामस्थांनी जनहिताच्यादृष्टीने आपले स्तरावर सदरचा निर्णय घेतला आहे. कंपाऊंड वॉलच्या बाहेरील जागेवरील ताबा हा जिल्हा परिषदेच्या मालकीचाच राहील, याबाबत शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक व ग्रामपंचायत यांना निर्देश देण्यात आले आहेत.

कंपाऊंड वॉल घातलेल्या हद्दीत श्री.शंकर गुणाजी कांगणे यांच्याही जागेचा अंतर्भाव आहे. मात्र, श्री.कांगणे यांनी सदरील जागा तसेच शाळेच्या कंपाऊंडच्या आत असलेली जागा बिनशर्त जिल्हा परिषदेच्या नांवे करुन देण्यास सहमती दर्शविली आहे.

सदरील जागेवर कोणतेही अतिक्रमण झाले नसल्याने ग्रामपंचायतीवर कार्यवाही करण्यात आली नाही.

(३) हे खरे नाही,

जिल्हा परिषदेच्या आवारात शाळा व्यवस्थापन समितीने देणगी स्वरुपात शाळेतील विद्यार्थ्यांच्या करमणूकीसाठी व शाळेतील उपक्रमासाठी रंगमंच बांधून घेतलेला आहे. श्री, प्रकाश बेर्डे यांनी रंगमंचाकरीता देणगी दिली आहे. हा मंच दिनांक १५/०१/२००७ रोजी बांधून पूर्ण करुन तो शाळेच्या ताब्यात देण्यात आला आहे. सदर मंचाला शारदा मंच असे नांव नामफलकावर दिसून येत आहे. मात्र सदरचे नांव हे देणगीदार यांच्या आईचे आहे, हे स्पष्ट होत नाही. तथापि, देणगीदार यांनी सदरचे नाव सुचविले असल्याबाबत ग्रामस्थांच्या जाब जबाबावरून स्पष्ट होते.

शाळेच्या पूर्वकडील रस्ताच्या बाजूस सार्वजनिक बांधकाम खात्याच्या हद्दीत रस्त्याच्या लगत ग्रामस्थांना उपयोगी पडेल, असे पिकअप शेड बांधण्यात आले आहे. सदर शेड हे ग्रामपंचायतीच्या कोणत्याही निधीतून बांधण्यात आले नसून ते खाजगी देणगी स्वरुपात प्राप्त निधीतून बांधण्यात आले आहे. ते ग्रामपंचायतीच्या परवानगीने बांधण्यात आले नाही. मात्र या शेडचा ग्रामस्थांना उपयोग होत आहे व विद्यार्थ्यांच्याही येण्या जाण्यामध्ये अडचण होत नाही.

देवडे ग्रामपंचायत तंटामुक्त व हागणदारी मुक्त आहे. याबाबत बेसलाईन सर्व्हेनुसार पडताळणी केली असता, गावातील सर्व कुटुंबाकडे शौचालय असून ग्रामस्थ वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयाचा वापर करीत आहेत. ग्रामपंचायतीच्या कारभारामध्ये कोणता बोगसपणा आहे, हे तक्रारदाराने नमूद केले नाही व त्यावर अधिक माहिती देण्यासही नकार दिला. यास्तव, ग्रामपंचायतीच्या कोणत्या कामात अनियमितता झाली आहे, हे समजून येत नाही.

(४) ग्रामपंचायतीच्या कोणत्या कामात अनियमितता झाली आहे, हे तक्रारदाराने नमूद केले नाही तसेच त्यावर अधिक माहिती देण्यासही नकार दिला आहे. यास्तव ग्रामपंचायतीच्या नेमक्या कोणत्या कामात अनियमितता झाली असल्याचे दिसून न आल्याने याबाबत चौकशी करण्यात आली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुपरस्पेशालीटी हॉस्पीटल येथे "हेल्थ इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट सिस्टीम" प्रणाली सुरु करण्याबाबत

**(४७) ४७१७५ (०५-०७-२०१९) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार : दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ३५७३८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रूग्णालयातील रूग्णांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होण्यासाठी "हेल्थ इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट सिस्टीम" (एच.एम.आय.एस.) प्रणाली सन २००६ पासून वैद्यकीय शिक्षण विभागाने लागू केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रणाली सुपरस्पेशालीटी हॉस्पीटल येथे कार्यान्वित झाली नसल्याचे दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रणाली सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०७-१२-२०२१) :** (१), (२) व (३) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न रुग्णालयामधील प्रशासन अधिक गतीमान करण्यासाठी १९ ठिकाणी एच.एम.आय.एस. प्रणाली सुरु करण्याबाबत मे.एच.पी. इंडिया या कंपनी बरोबर २००६ मध्ये करार करण्यात आला. हा प्रकल्प राबविण्यासाठी अ.मु.स. (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली

स्थापन करण्यात आलेल्या सुकाणू समितीच्या निर्णयानुसार टप्प्याटप्प्याने १६ ठिकाणी सदर प्रकल्प राबविण्यात आला आहे. कोल्हापूर, धुळे व सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल नागपूर या तीन ठिकाणी तांत्रिक व प्रशासकीय कारणास्तव सुकाणू समितीने मान्यता दिलेली नसल्याने सदर ठिकाणी प्रकल्प कार्यान्वित करता आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील आरे मधील आदिवासीना आरे येथे घरे देण्याबाबत

**(४८) ४७५८८ (०६-०७-२०१९) श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगर आरे येथील आदिवासींना आरे मध्येच घरे देण्याकरीता २७ आदिवासी पाड्यातील आदिवासींच्या घरांच्या सर्वेक्षणाचे काम तात्काळ सुरु करण्याचे आदेश माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मा.गृहनिर्माण राज्यमंत्री यांनी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सर्वेक्षणाचे काम पूर्ण होवून अहवाल सादर करण्यात आला आहे काय तसेच कामाची सद्यःस्थिती काय आहे ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०८-१२-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.
२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अंतर्गत उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड-३ यांचेकडून सन २०१७ मध्ये आरे वसाहतीमधील आदिवासी पाड्यांचे सर्व्हेक्षण करण्यात आले होते तथापि, आरेमधील आदिवासींच्या विरोधामुळे सदरचे सर्व्हेक्षण होऊ शकलेले नाही. आरेमधील आदिवासींच्या विविध मागण्या व त्यांचेशी सबंधित विशिष्ट प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी सर्व्हेक्षणाच्यावेळी आदिवासी विभागाचे प्रतिनिधी यांच्यासह सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण करणे आवश्यक आहे, त्याकरीता आदिवासी विभागामार्फत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून तज्ञ मार्गदर्शक प्रतिनिधी यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. आदिवासी विभागाचे कर्मचारी उपलब्ध झाल्यानंतर सर्व्हेक्षणाचे काम सुरु करणे शक्य होणार आहे.

---

## राज्यातील रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४९) ५०८६९ (२३-०६-२०१४) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र इत्यादी ठिकाणी विशेष तज्ञ वैद्यकीय अधिकारी व आरोग्य विषयक कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याने रुग्णांची गैरसोय होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही वैद्यकीय अधिकारी व आरोग्यविषयक कर्मचाऱ्यांची पदे न भरण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याप्रकरणी विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१४-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्यस्तरावरील स्वतंत्र निवडमंडळाच्यावतीने वैद्यकीय अधिकारी, गट-अ यांच्या पदभरतीची दोन वेळा वेगवेगळी जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून त्यानुसार नोव्हेंबर, २०२१ अखेरपर्यंत एकूण १८२७ उमेदवारांना नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहे. गट-क व गट-ड ची भरतीप्रक्रियेची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या पंचायत समिती वरोरा मधील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षकांना घर भाडे भत्ता देण्यात न आल्याबाबत

**(५०) ५१९२२ (०१-०७-२०१४) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती वरोरा (जि.चंद्रपूर) येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना माहे जानेवारी, २०११ ते माहे ऑगस्ट, २०१३ या कालावधीत घरभाडे भत्ता देण्यात आला नाही. या कालावधीत घरभाडे भत्ता द्यावा, याकरीता वारंवार निवेदने देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) वरोरा पंचायत समितीचे सभापती श्री.लडके व उपसभापती श्री.पुरुषोत्तम निखाडे हे शिक्षकाकडून प्रत्येकी रुपये २०००/- गोळा करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी तक्रारी करुनसुध्दा जिल्हा परिषदेतील अधिकारी व पदाधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने दोषीविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ (०९-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील पंचायत समिती, वरोरा अंतर्गत जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना ते मुख्यालयी वास्तव्याने राहात नसल्यामुळे माहे जानेवारी, २०११ मे माहे मार्च, २०१३ या कालावधीतील घरभाडे भत्ता कपात करण्यात आलेला होता. परंतु त्यांनी पंचायत समिती वरोरा येथे मुख्यालयी राहात असल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले असल्यामुळे त्यांचे माहे जानेवारी, २०११ ते ऑगस्ट, २०१३ या कालावधीतील घरभाडे भत्ता रोखीने अदा करण्यात आलेला आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.